# श्रीमंत मालोजीराजे सहकारी बँक लि.

मुख्य कार्यालय : मुधोजी मनमोहन राजवाडा परिसर, फलटण, जिल्हा सातारा ४१५५२३

## ५० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

(फक्त सभासदांकरिता)

प्रति,

सन्माननीय सभासद बंधू व भगिनीनों,

आपणास कळविण्यात येते की, **श्रीमंत मालोजीराजे सहकारी बँक लि. या बँकेची ५० वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक २७/०९/२०२५ रोजी सकाळी ११.४५ वा.** बँकेच्या मुख्य कार्यालयातील सभागृहामध्ये खालील विषयांवर विचार विनिमय करणेसाठी आयोजित करण्यात आली आहे. सदर सभा बँकेचे विद्यमान अध्यक्ष श्रीमंत संजीवराजे विजयसिंह नाईक निंबाळकर यांचे अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. तरी आपण या सभेस वेळेवर उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

### ◆ सभे पुढील विषय ◆

१) मागील दि. २८/०९/२०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

२) मा. संचालक मंडळाने सादर केलेला सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचा अहवाल व वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेला ताळेबंद व नफा-तोटा पत्रक वाचून त्यास स्वीकृती देणे.

३) मा. वैधानिक लेखापरीक्षक यांचा सन २०२४-२५ चा लेखापरीक्षण अहवाल वाचून त्याची नोंद घेणे व स्वीकृत करणे.

४) मा. वैधानिक लेखापरीक्षकांच्या सन २०२३-२४ अखेरचा दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे व तो स्वीकृत करणे.

५) सन २०२५-२६ सालाचे अंदाजपत्रक संमत करणे व सन २०२४-२५ सालात अंदाजपत्रकापेक्षा ज्या बाबींवर अधिक खर्च झालेला आहे, त्यास मान्यता देणे.

६) सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी सहकार खातेचे नामतालीकेवर असणाऱ्या व रिझर्व्ह बँकेने मान्यता दिलेल्या वैधानिक लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे व त्याचे मानधन ठरविणे.

७) सन २०२६-२०२७ व सन २०२७-२०२८ या आर्थिक वर्षासाठी समवर्ती लेखापरिक्षक यांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.

८) सन २०२४-२५ च्या नफ्याच्या विनियोगाबाबत निर्णय घेणे.

९) म.स.सं. अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील नियम ४९ मधील तरतुदीनुसार संस्थेचा वसुलीचा हक्क अबाधित ठेवून मा.वैधानिक लेखापरीक्षक यांनी प्रमाणित केलेली वसूल न होणाऱ्या थकीत कर्ज खात्यांचे निर्लेखन करणेस मान्यता देणे.

१०) सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात शासनमान्य एकरकमी कर्ज परत फेड योजने अंतर्गत व्याज सवलत देऊन बंद केलेल्या कर्ज खात्यांची माहिती घेणे व त्यास कार्योत्तर मान्यता देणे.

११) बँकेच्या संचालक व त्यांच्या नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.

१२) ५० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापीत करणे.

१३) मा. अध्यक्षांचे अनुज्ञेने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

**माननीय संचालक मंडळाच्या आदेशानुसार,**
**राजेश लड्ढा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**स्थळ - फलटण**
**दिनांक : ०८.०९.२०२५**

### ◆ सूचना ◆

१) गणपूर्ती (कोरम) अभावी सभा तहकूब झाल्यास सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल.

२) दि. ३१ मार्च २०२५ अखेर बँकेचा ताळेबंद, नफा-तोटा पत्रक व वार्षिक अहवालाची संपूर्ण माहिती मुख्यालयासह सर्व शाखांच्या नोटीस बोर्डवर व वर्तमानपत्रात तसेच बँकेची वेबसाईट www.malojirajebank.com वर सभासदांच्या माहितीसाठी प्रसिध्द केली आहे.

३) ज्या सभासदांना सभेच्या विषयांबाबत प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी दि.१६ सप्टेंबर २०२५ पासून दि.२४ सप्टेंबर २०२५ पर्यंत शाखा व मुख्य कार्यालयाचे कार्यालयीन वेळेत लेखी स्वरुपात प्रश्न द्यावेत. अथवा ho@malojirajebank.com या मेलवर उपरोक्त कालावधीत,सभासद क्रमांक व संपूर्ण नांव नमूद करुन पाठवावेत. सभेच्या विषय-पत्रिकेतील विषयांबाबतचे प्रश्न विचारात घेतले जातील.

## ◆ विशेष सूचना ◆

१) भारतीय रिझर्व्ह बँकेच्या सूचने नुसार, सर्व सभासदांनी व खातेदारांनी त्यांची अद्ययावत के.वाय.सी. (KYC) बाबतच्या कागदपत्रांची सर्वोतोपरी पूर्तता करणे आवश्यक आहे. अद्ययावत के.वाय.सी.ची पूर्तता केली नसल्यास आपल्या नजिकच्या शाखेत संपर्क साधावा ही विनंती.

२) सभासदांनी त्यांचे भाग-भांडवल रकमेस वारस नोंद केली नसल्यास त्याबाबतची पूर्तता करावी.

३) सर्व सभासदांनी व खातेदारांनी त्यांचा सध्याचा पत्ता व सध्याचा मोबाईल नंबर व ईमेल आयडी नजिकच्या शाखेत संपर्क साधून अद्ययावत करुन घेणे त्यामुळे बँकेस आपणाशी संपर्क करणे सुलभ होईल. तसेच सध्या एका भागाची (शेअर्स) किंमत रु. १000/- असून ज्या सभासदांचे अपूर्ण शेअर्स आहेत त्यांनी आपले शेअर्स पूर्ण करावेत.

४) ज्या ठेव खात्यावर मागील १0 वर्षे व्यवहार झाले नाहीत अथवा मुदत संपून १0 वर्षापेक्षा ज्यादा कालावधी झालेला आहे अशा सर्व खात्यावरील रक्कम रिझर्व बँकेकडे (DEAF खाती) वर्ग करावी लागते. तरी बँकेतील सर्व ठेव खातेदारांनी आपले खातेवर किमान ६ महिन्यातून एकदा व्यवहार करुन खाते नियमित करुन घ्यावे. DEAF खाते वर्ग झालेल्या खात्यांची यादी नोटीस बोर्डवर प्रसिध्द केली असून सदर खातेस नविन केवायसी देऊन खाते व्यवहार करुन खाते नियमित करुन घेतल्यानंतर सदर खात्यावरील रिझर्व्ह बँकेकडे वर्ग झालेली रक्कम परत मिळवता येईल.

५) सर्व लॉकर धारकांनी किमान सहा महिन्यातून एकदा लॉकर ऑपरेट करणे बंधनकारक आहे.

६) वैधानिक लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेला अहवाल सालातील ताळेबंद व नफा-तोटा पत्रक दि.२५ जून २०२५ च्या ''दैनिक सांजवार्ता'' वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेला आहे.

बुक – पोस्ट

प्रति,
श्री. / श्रीमती ____________________

____________________

____________________

पाठविणार :-

**श्रीमंत मालोजीराजे सहकारी बँक लि., फलटण**

मुधोजी मनमोहन राजवाडा परिसर, फलटण, ता. फलटण, जि. सातारा